# छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

बालचित्रवाणी इमारत , गोपाळ गणेश आगरकर रोड, सेनापती बापट रोडच्या मागे, पुणे (महाराष्ट्र) - ४११००४

| Email ID : sarthipune@gmail.com | CIN- U74999PN2018NPL177394 | Website : www.sarthi-maharashtragov.in | 020-25592502 |
|---|---|---|---|


जा.क्र.सारथी/देशांतर्गत शिष्यवृत्ती/२४८७/२०२२-२३ दि. २१/१०/२०२२

प्रती,

Hon. Vice Chancellor's
Mahatma Gandhi Antarrashtriya Hindi Vishwavidyalaya,
Wardha, Maharashtra

**विषय :- डॉ.पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती योजनांची प्रसिध्दी आपले कार्यालयातील नोटिस बोर्ड वर लावणेबाबत..**

**महोदय,**

वरिल विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की , महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा — कुणबी या लक्षित गटांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासांसाठी कंपनी कायदा २०१३ च्या कलम ८ खाली सारथी संस्थेची नोंदणी माहे जून २०१८ रोजी करण्यात आली आहे. ही संस्था नियोजन विभाग महाराष्ट्र शासन यांच्या अधिपत्याखाली पुणे येथे कार्यरत आहे.या संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. अजित निंबाळकर (भा.प्र.से.सेवानिवृत्त) हे आहेत.

सारथी संस्थेने दि.१५.०९.२०२२ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये लक्षित गटांतील ३०० विद्यार्थ्यांकरिता **डॉ.पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती योजना सन २०२२-२३** पासून सुरु करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. भारतातील नामंकीत २०० विद्यापीठ / महाविद्यालयां मध्ये प्रवेश घेतलेल्या लक्षित गटांतील पात्र विद्यार्थ्यांना खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून लाभ देण्यात येईल.

या शिष्यवृत्ती अंतर्गत विद्यार्थ्यांना मिळणारे लाभ खालील प्रमाणे असतील :-

(अ) डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेल्या विद्यार्थ्यास संबंधित विद्यापीठ/ शैक्षणिक संस्थेने अभ्यासक्रमासाठी ठरवून दिलेले पूर्ण शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, नोंदणी फी, जिमखाना, ग्रंथालय, संगणक इत्यादी शुल्क संबंधित विद्यापीठ/ शैक्षणिक संस्थेमार्फत संबंधित विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येईल. संबंधित विद्यार्थ्याने विद्यापीठ / शैक्षणिक संस्थेला शुल्क अदा केल्याचे पुरावे सारथी सस्थेस सादर करणे आवश्यक राहील.

(आ) संबंधित विद्यापीठ/ शैक्षणिक संस्थेच्या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना संस्थेने आकारणी केलेले शुल्क तसेच, भोजन शुल्काची सत्रनिहाय रक्कम संबंधित विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यास पात्र असतील.

(इ) जे विद्यार्थी वसतिगृहात जागेअभावी अन्यत्र राहात असतील अशा विद्यार्थ्यांना वसतिगृह शुल्क व भोजन शुल्काची रक्कम ही तो शिक्षण घेत असलेल्या संबंधित संस्थेच्या आकारणी करण्यात येत असलेल्या (वसतिगृह शुल्क व भोजन शुल्क) रक्कमेच्या मर्यादेत सत्रनिहाय रक्कम संबंधित विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यावर जमा करण्यास पात्र असतील.

Scanned with CamScanner

(ई) योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांस अभ्यासक्रमासाठी लागणाऱ्या पुस्तकांसाठी ₹ २५,०००/- व शैक्षणिक साहित्य तसेच, इतर शैक्षणिक खर्च यासाठी एकुण ₹ २५,०००/- अशी एकुण ₹ ५०,०००/- प्रत्येक वर्षी संबंधित विद्यार्थ्यांस त्याच्या आधार संलग्न बँक खात्यावर दोन टप्प्यात अदा करण्यात येईल. यासाठीचा तपशिल संबंधित शैक्षणिक संस्थेमार्फत विहित नमुन्यात सारथी कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक असेल.

महाराष्ट्र राज्यांतील रहीवासी असलेल्या व ज्या विध्यार्थ्यांच्या आई वडीलांचे सर्व मार्गाने मिळणारे एकुण वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखांच्या (नॉन क्रिमीलेअर) पेक्षा कमी आहे अशा लक्षित गटांतील पात्र विद्यार्थ्यांना हि शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. या योजनेची जाहिरात दि.०७/१०/२०२२ रोजी मराठी वृत्तपत्रांत प्रसिध्दिसाठी देण्यात आलेली आहे तसेच सारथी संस्थेच्या संकेतस्थळावर https://sarthi-maharashtragov.in/ सुध्दा प्रकाशित करण्यात आलेली आहे.सदर योजना सारथी संस्थेमार्फत प्रथमत:च राबविण्यात येत असल्यामुळे लक्षित गटांतील पात्र लाभार्थ्यांपर्यंत या योजनेची माहिती होणे आवश्यक आहे.

आपणास विनंती की , **डॉ.पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती योजना सन २०२२-२३** या योजनेच्या जाहिरांतीचा मसूदा आपल्या कार्यालयातील नोटिस बोर्ड वर लावण्यात यावा. तसेच सदरची जाहीरात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचेल यादृष्टीने प्रयत्न करावा व लक्षित गटातील विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक ई-मेलवर सदरची माहिती पाठविण्यात यावी. जेणेकरुन लक्षित गटांतील पात्र विद्यार्थी या योजनेचा लाभ घेण्यासाठी सारथी संस्थेकडे अर्ज दाखल करू शकतील.

सहपत्र – सोबत जाहिरात मसूदा

Ashok Kakade.

**व्यवस्थापकीय संचालक**

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे

Scanned with CamScanner